# ‘विशेष’ विद्यार्थ्यांना व्हिलचेअर आणि कमोडचेअरचे वाटप

**पुणे : प्रतिनिधी**

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाउंडेशन (एमएमएफ) आणि रिचमंड युनिव्हर्सिटी (लंडन) यांनी विशेष मुलांसाठी सहकार्याचा हात पुढे केला आहे. या अंतर्गत सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त विद्यार्थ्यांना ते ३१४ व्हिलचेअर, ३१४ कमोड चेअर्स आणि १०० विशेष सुधारित खुर्च्या त्यांनी प्रदान केल्या आहेत. फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे सॅबिस्टियन मोनी व मुकुल माधव फाउंडेशनचे अतुल माने यांच्या हस्ते व्हिलचेअर आणि कमोडचेअर प्रदान करण्यात आल्या.

## मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम

या दिशेने एक पाऊल उचलताना, फाऊंडेशनने लाभार्थ्यांना १४ व्हिलचेअर आणि कमोड खुर्च्या प्रदान केल्या. रिचमंड युनिव्हर्सिटी, लंडन यांनी उभारलेल्या निधीतून ही मदत करण्यात आली. बाकीच्या सी. पी. चेअर्स, व्हिलचेअर आणि आणि कमोड चेअर्स पुढील एका वर्षात देण्यात येतील. या प्रकल्पाची अंदाजे किंमत ६१.०७ लाख रुपये एवढी आहे.

हे लाभार्थी सातारा जिल्ह्यातील असून यामध्ये स्नेहा तानाजी ढाणे (सातारा-पाडळी), अम्मारा मुशर्रफ महापुले (सातारा), अनिकेत संजय जाधव (सातारा-शाहुपुरी), हर्षवर्धन विजय ननावरे(सातारा-वार्ये), हर्षवर्धन प्रविण भोसले (सातारा -शाहुपुरी), गौरव राजेंद्र जाधव(सातारा-देगाव), अथर्व अनिल वाघमोड (सातारा-धनगरवाडी), रुपेश आप्पासो मोहिते (सातारा-माजगाव), अमृता शिवाजी साळुंखे (सातारा-नागठाने), वैभव शंकर विधाते (सातारा-अतित), शुभम सूर्यकांत सनस, सागर कालिदास आगलावे (कोरेगाव-जांभबुद्रूक), पूजा अनिल सावंत(कोरेगाव), गणेश हनुमंत गुरव (कोरेगाव) या विशेष विद्यार्थ्यांना व्हिलचेअर आणि कमोड चेअर प्रदान करण्यात आल्या.

या उपक्रमाची माहिती देताना एमएमएफ च्या विश्वस्त रितु छाब्रिया यांनी सांगितले, सातारा जिल्हा परिषदेने एक सर्वेक्षण करून सातारा जिल्हा आणि परिसरातील सेरेब्रल पाल्सीने ग्रस्त ३१४ विद्यार्थी निश्चित केले होते. या मुलांना शाळेत तसेच घरीही समस्यांचा सामना करावा लागतो, असे आम्हाले आढळले. म्हणून एमएमएफ आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीजने या मुलांना प्रत्येकी एक व्हिलचेअर आणि एक कमोडचेअर देऊन आणखी मदत करण्याचा निर्णय घेतला. सरकारच्या महत्त्वाकांक्षी अशा सर्व शिक्षा अभियान आणि शिक्षणाचा अधिकार कायद्यात सर्व मुलांना शालेय शिक्षणाच्या कक्षेत आणण्याचा उद्देश आहे.



**फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे सॅबिस्टियन मोनी व मुकुल माधव फाउंडेशनचे अतुल माने यांच्या हस्ते व्हिलचेअर व आणि कमोड चेअरचा स्वीकार करताना विशेष विद्यार्थी हर्षवर्धन प्रवीण भोसले (सातारा -शाहुपुरी) वडील प्रवीण भोसले व आई मिना भोसले.**

अनेक विद्यार्थ्यांनी शारीरिक विकलांगतेमुळे शाळेपासून दूर राहावे लागते. यावर उपाय म्हणून सरकारने अपंगांसाठी शिक्षण ही संकल्पना सुरू केली असली तरी सेरेब्रल पाल्सी, बहुविध विकलांगता, अस्थिव्यंग इ. समस्या असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेपासून दूर राहावे लागते कारण त्यांना बसण्यासाठी, उभे राहण्यासाठी, शारीरिक स्थिती कायम ठेवण्यासाठी खास खुर्च्या व साधने लागतात आणि ते महाग असतात. अशा विशेष मुलांच्या शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी, सातारा जिल्हा परिषदेने फाऊंडेशनला मदत करण्याची विनंती केली होती. श्रीमती छाब्रिया यांना लिहिलेल्या पत्रात सातारा जि. प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील यांनी मदतीसाठीचे तपशील देऊन आणि ‘सुधारित सी. पी.’ खुर्च्यांसाठी निधी पुरविण्याची विनंती केली होती. सातारा जि. प.चे रोहित बर्गे आणि ज्ञानेश्वर शेलार यांच्या मते, या प्रकल्पामुळे या विशेष मुलांना अत्यंत मदत होईल आणि त्यातून सर्वांसाठी शिक्षण हे लक्ष्य पूर्ण करण्याची अपेक्षा आहे.